REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.2331(UIF)
VOLUME - 7 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2018

# व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण : प्रगती आणि समस्या

प्रा. डॉ. नरेंद्र श्रीधर बागडे
सहाय्यक प्राध्यापक, वाणिज्य विभाग ,
डॉ. मधुकरराव वासनिक पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय कामठी रोड, नागपूर.

## प्रास्ताविक :

भारत देशाला स्वातंत्र्य मिळाले तेव्हा बँक व्यवस्थेचा फारचा विकास झाला नव्हता. देशात अनेक छोट्या व्यापारी बँक स्थापन झाल्या होत्या. अप्रामाणिक, पुराणमतवादी व बँक विकासाच्या बाबतीत निरुत्साही लोकांच्या अधिपत्याखाली व्यापारी अधिकोषाची कार्यकारणी होती. बँकेच्या व्यवहारात खुपच कमी जोखीम स्विकारण्याच्या वृत्तीमुळे व्यापारी बँकेचा फारसा प्रसार होऊ शकला नाही. ही बँक प्रामुख्याने शहरी भागापुरतेच मर्यादित होती. कृषी क्षेत्र व औद्योगिक क्षेत्राला दिलेली कर्जे अगदीच नाममात्र होती. त्यामुळे व्यापारी बँकेच्या प्रगतीच्या दृष्टीकोनातून दोन महत्वपूर्ण पावले उचलण्यात आली. त्यातले पहिले पाऊल १९४९ मध्ये अधिकोषण नियमन अधिनियम मंजूर करण्यात आला. या अधिनियमामुळे रिझर्व्ह बँकेला व्यापारी बँकेवर नियंत्रण ठेवण्याचे अधिकार प्राप्त झाले. तसेच १ जानेवारी १९४९ ला रिझर्व्ह बँकेचे राष्ट्रीयीकरण झाले.

भारताने स्वातंत्र्यानंतर देशाच्या विकासासाठी आर्थिक नियोजनांचा स्विकार केला व देशाची विकासाच्या दिशेने वाटचाल सुरु झाली. देशाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी बँक व्यवसायाची भूमिका महत्वाची असून शेती क्षेत्रासाठी, उद्योग धंद्यासाठी मोठ्या प्रमाणात वित्त पुरवठा बँक करीत असते. यासाठी व्यापारी बँकांचे फार मोठे योगदान अपेक्षित होते. पण विकास कार्यात त्यांचा योग्य सहभाग योगदान मिळत नसल्याचे दिसून आल्याने नंतर राष्ट्रीयीकरणाची मागणी जोर धरु लागली. परंतु राष्ट्रीयीकरण करण्यापूर्वी बँक कामकाजावर सामाजिक नियंत्रण ठेवण्यात आले. सामाजिक नियंत्रण म्हणजे, केंद्र सरकारने आर्थिक व सामाजिक उद्दिष्ट्ये साध्य करण्यासाठी रिझर्व्ह बँकेला जादा अधिकार देण्याच्या हेतूने बँक व्यवसाय सुधारण्याचा कायदा केला, यालाच बँकावरचे सामाजिक नियंत्रण असे म्हणतात. वरील सामाजिक नियंत्रण पुरेसे नसल्याने भारत सरकारने १९ जूलै १९६९ या दिवशी १४ खाजगी बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या १४ अशा बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले ज्यांच्या ठेवी जून १९६९ मध्ये ५० कोटी रु. पेक्षा अधिक होत्या व नंतर १५ एप्रिल १९८० रोजी साली ६ खाजगी बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. या ६ अशा बँकाचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले ज्यांच्या ठेवी १४ मार्च १९८० रोजी २०० कोटी रु. पेक्षा अधिक होत्या.

## व्याख्या

आर्थिक सत्तेचे केंद्रीकरण टाळण्यासाठी सरकार जेव्हा खाजगी लोकांच्या हातातील बँक व्यवसाय स्वत:च्या ताब्यात घेवुन भाग भांडवल, व्यवस्थापन, नियंत्रण व मालकी स्वत: करते. यंत्रणेस राष्ट्रीयीकरण असे म्हणता येईल.



## संशोधनाचे उद्दिष्ट्ये

१) व्यापारी बँकेच्या राष्ट्रीयीकरणानंतर देशातील आर्थिक प्रगतीचा अभ्यास करणे.

२) व्यापारी बँकेच्या राष्ट्रीयीकरणानंतर उदभवलेल्या समस्यांचा अभ्यास करणे.

## राष्ट्रीयीकरणानंतरची प्रगती

राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकेच्या विकासाला चालना मिळाली व हा विकास कशा प्रकारे घडून आला हे पुढीलप्रमाणे

### १) बँकेच्या शाखांचा विस्तार करणे

आर्थिक विकास करण्यासाठी व्यापारी बँकेच्या शाखा विस्तार होणे आवश्यकच होते. जून १९६९ मध्ये अनुसूचित व्यापारी बँकेच्या ८२६२ शाखा होत्या. जून २००० मध्ये ६४८३४ पर्यंत वाढल्या. त्यात ग्रामीण भागात १९६९ जूलै मध्ये १८६० असलेल्या बँकेच्या संख्येत वाढ होवून ती २००० पर्यंत ३२,७०९ इतकी झाली.

### २) ठेवींमध्ये वाढ करणे

१९ जुलै १९६९ मध्ये भारतातील १४ प्रमुख व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण झाल्यानंतर ह्या बँकेच्या ठेवींमध्ये वाढ घडून आली. जुलै १९६९ मध्ये बँकेच्या एकूण ठेवी ४६६५ कोटी रुपयांच्या होत्या त्या २००० पर्यंत ९,३१,६७७ कोटी रुपयांपर्यंत वाढलेल्या होत्या. भारतातील आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या राज्यात देखील ठेवींचा विस्तार समाधानकारकरित्या होता.

### ३) कर्ज पुरवठ्यात वाढ करणे

राष्ट्रीयीकरणाचा उद्देश विकासकार्यासाठी बँकाद्वारे प्रत्यय पुरवठा व्हावा हा होता. प्रामुख्याने पंचवार्षिक योजनांमध्ये ज्या क्षेत्रांना प्राथमिकता देण्यात आली त्या क्षेत्रांना पुरेसा प्रत्यय पुरवठा उपलब्ध व्हावा हा उद्देश होता. व्यापारी बँकेंच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकेच्या कर्ज पुरवठ्यात पुरेशी वाढ झाली आहे. जून १९६९ मध्ये दिलेल्या कर्जाची एकूण रक्कम ३३९९ कोटी रु. होती. ती २००१ मध्ये ५,११,४३४ कोटी रुपयांपर्यंत वाढली. ही वाढ १५० पट आहे. राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांनी कृषी, लघुउद्योग या अग्रक्रम क्षेत्रांना मोठ्या प्रमाणावर कर्ज देण्यास सुरुवात केल्यामुळे २००० मध्ये या कर्जाचे प्रमाण ३५.१ टक्क्यांपर्यंत वाढलेले होते.

### ४) अग्रणी बँक योजना

राष्ट्रीयीकरणानंतर व्यापारी बँकांनी अधिकतम नफा मिळविण्याचे ध्येय बाजूला सारुन आर्थिक विकासाला हातभार लावण्याचे कार्य केले. रिझर्व्ह बँकेच्या नरिमन समितीच्या शिफारशी स्वीकृत करुन अग्रणी बँक योजना “Lead Bank Scheme” तयार करण्यात आली. ह्या योजनेअंतर्गत देशातील जिल्हे १४ बँकांना वाटप करण्यात आले. व या जिल्ह्यांना प्रत्यय पुरविण्याची व ठेवी गतिक्षम करण्याची व जिल्ह्यांच्या योजनांना हातभार लावण्याचे कार्य सोपविले गेले.

## राष्ट्रीयीकरणानंतरच्या समस्या

भारतातील व्यापारी बँकाचे राष्ट्रीयीकरण केले परंतु बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे व्यवहारामध्ये अनेक समस्या निर्माण झाल्या त्या पुढीलप्रमाणे,

### अनुत्पादक कर्जाचे प्रमाण वाढले

व्यापारी बँकाच्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकाच्या अनुत्पादक कर्जाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत गेले. जून २०१४ मध्ये राष्ट्रीयीकृत बँकांची अनुउत्पादक कर्ज रक्कम २,३४,५८३ कोटी रुपये इतकी होती.

### राजकीय हस्तक्षेप

राष्ट्रीयीकृत बँकांच्या संदर्भात महत्वाची समस्या म्हणजे या बँकांच्या व्यवहारात राजकीय व्यक्तींचा मोठ्या प्रमाणावर हस्तक्षेप दिसून येतो. त्यामुळे या बँकांचे व्यवस्थापन योग्य प्रकारे न झाल्याने त्यांच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम दिसून येतो.

### स्पर्धेचा अभाव

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे त्यांच्यातील स्पर्धा कमी झाली आहे. स्पर्धेच्या अभावामुळे त्यांच्या कार्यक्षमतेत वाढ करण्यासंदर्भात उदासिनता दिसून येते.

## वाढता तोटा

राष्ट्रीयीकृत बँकांना १९९२.९३ मध्ये ३६४८ कोटी रुपये, १९९३.९४ मध्ये ४७७९ कोटी रुपये व १९९५.९६ मध्ये ११६० कोटी रुपये एवढ्या मोठ्या प्रमाणात तोट्यास सामोरे जावे लागले.

## अतिरिक्त नोकर भरती

व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर कर्मचाऱ्यांची आवश्यकतेपेक्षा अधिक नोकरभरती करण्यात आली. त्यामुळे बँक कर्मचाऱ्यांच्या वेतनावरील खर्च वाढत गेल्याने बँकांच्या नफा क्षेतेवर त्याचा परिणाम झाला.

## मूल्यमापन

जुलै, १९६९ मध्ये व्यापारी बँकांच्या राष्ट्रीयीकरणानंतर गुंतवण व प्रत्यय या संदर्भात निर्देशिक कार्यक्रम सुरु करण्यात आला. या कार्यक्रमानुसार गुंतवण करण्याची विशिष्ट पद्धती व कर्ज देतांना विशिष्ट प्राधान्यक्रमानुसारच द्यावयाची होती. याचा परिणाम बँकेच्या नफ्याचे प्रमाण घटले. १९९२.९३ मध्ये नफ्याच्या नवीन मानदंडाप्रमाणे स्टेट बँक व तिच्या सहाय्यक बँकाच्या नफ्याचे प्रमाण घटले ते खालीलप्रमाणे

१९८० मध्ये अंदाजपत्रकातील तूट भरुन काढण्यासाठी सरकारला रिझर्व्ह बँक व व्यापारी कर्जे घ्यावी लागली. त्यामुळे अर्थव्यवस्थेत मुद्रास्फितीची परिस्थिती निर्माण झाली यावर नियंत्रण ठेवण्यासाठी बँकांना आपल्या रोखतेच्या प्रमाणात वाढ करावी लागली व बँकांना आपला पैसा कमी व्याज देणाऱ्या सरकारी रोख्यांमध्ये गुंतवावा लागला. १९६९ च्या राष्ट्रीयीकरणानंतर बँकांना कृषी, लघुउद्योग, कुटीर उद्योगांना कर्जपुरवठा करण्याचे निर्देश देण्यात आले होते. यात काही प्रमाणात यशही प्राप्त झाले. परंतु ही कर्जे देणे बँकांच्या दृष्टीने महागात पडली. ही कर्जे देतांना पुरेसे तारणही न घेता देण्यात आली होती. व दिलेल्या कर्जाची परतफेडही वेळेवर केली जात नाही तसेच ग्रामिण भागातील युवकांना स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने बँकांना निर्देश देण्यात आले होते. त्यातही कर्ज घेणाऱ्यांची योग्यता व त्याच्या प्रकाराची सक्षमता न पाहाताच देण्यात आली. त्यामुळे बरीचशी कर्जे वसूल झाली नाही त्यामुळे बँकांचा नफा कमी झाला. कृषी, लघु व कुटीर उद्योगांना सवलतीच्या दराने केलेला कर्ज पुरवठा हा देखील बँकांना झालेल्या तोट्यासाठी कारणीभूत आहेत. तसेच राष्ट्रीयीकरणानंतर बँकांच्या प्रशासकीय खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाल्याने देखील बँकांची लाभप्रदता कमी झाली आहे. बँकाचा खर्च वाढण्यामागे बँकांनी अनेक नवीन शाखा सुरु केल्या, त्यासाठी नवीन कर्मचाऱ्यांची भरती, मुद्रास्फितीमुळे कर्मचाऱ्यांची वेतनातील वाढीची मागणी, आवश्यकतेपेक्षा जास्त कर्मचाऱ्यांची नियुक्ती या सर्व कारणांमुळे बँकांच्या खर्चात मोठ्या प्रमाणात वाढ झाली.

## संदर्भ .

१. बैरागी के. पी., 'भारतीय बॅंक व्यवस्था', अथर्व प्रकाशन, पुणे, २००४.
२) पहूरकर बी. बी., 'बँक व्यवसाय व वित', पिंपळापुरे आणि कं., १९९९
३) रसाळ राजेंद्र, 'भारतीय अर्थव्यवस्था', सक्सेस प्रकाशन, पुणे, २०१०.
४) अर्थसंवाद, ऑक्टोबर–डिसेंबर, खंड ३२ अंक ३, २००८.
५) बोधनकर सुधीर, अलोणी विवके, कुळकर्णी मृणाल 'सामाजिक संशोधन पद्धती', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर, २०१४.
6) Reserve Bank of India, Report on Trend and Progress of Banking in India, RBI Mumbai, Various Issues.
7) S. K. Misra & V. K. Puri 'Indian Economy', Himalaya Publication, 2008.